Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- IV APRIL 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# विनोबा भावे यांचे शैक्षणिक विचार

**प्रा. प्रवीण कारभारी शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर मिग

**प्रस्तावना :**

आचार्य विनोबा भावे एक महान स्वातंत्र्य सेनानी तसेच महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचे अनमोल विचार भूदान चळवळ आणि पहिला सत्याग्रही अशी विविध ओळख असलेले विनोबा भावे यांनी शिक्षण विषयक विचार मांडलेले आहेत. आधुनिक युगातील थोर ऋषी ते ज्ञानवंत विचारवंत चिंतन व बहुभाषी होते जगातील प्रश्नांची ते मूलगामी विचार करीत असत ते कर्मयोगी ज्ञानयोगी होते शिक्षण हा त्यांचा आवडता आणि जिव्हाळ्याचा विषय होता यांचे शिक्षण विषयक विचार यामुळे आजच्या समाजाला एक नवी दिशा मिळाली.

**अभ्यासाचा उद्देश:**

1. त्यांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करून त्या विचारांचे महत्व समजून घेणे.
2. आजच्या शिक्षण पद्धतीतील दोष समजून घेणे.
3. विनोबांनी शिक्षकांसाठी सांगितलेले आदर्श समजून घेणे.

**गृहीतकृत्य:**

1. आचार्य विनोबा भावे यांचे शिक्षण विषयक विचार महत्वाचे दिसतात.
2. आजच्या शिक्षण पद्धतीतील दोष असल्याचे दिसून येते.
3. विनोबांनी शिक्षकांसाठी सांगितलेले आदर्श म्हत्वाचे असल्याचे दिसते.

**संशोधन पद्धती:**

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक व ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहेतसेच प्रस्तुत . लघुशोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे . आचार्य विनोबा भावे यांचे शिक्षण विषयक विचार जाणून घेण्यासाठी या संदर्भात अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य सामुग्रीचा आधार घेऊन निष्कर्ष पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे .

**विनोबांचे शिक्षणविषयक विचारांचे विश्लेषण:**

ज्या व्यक्तीने सागराचे दर्शन घेतले त्याच्यात ध्यानात येते की ज्ञान अनंत आहे आणि मला मिळालेले ज्ञान अंश मात्र आहेत. म्हणून मला ज्ञानाची उपासना चालू ठेवली पाहिजे मी कितीही ज्ञान मिळवले तरी शेवटी जगात ज्ञानात शिल्लक राहते.

**खरे शिक्षण कोणते :** विनोबा म्हणतात आमच्या शिक्षणाचा मंत्र सांगावयाचा असल्यास तू सच्चिदानंद हा आहे. सत हा कर्मयोग आहे. त्याच्याशिवाय जीवन

चालत नाही चित्त हा ज्ञान योग आहे त्याच्याशिवाय जीवन जड बनते आनंदा शिवाय तर जीवनात काहीच रस राहणार नाही. ज्या शिक्षणात सत् चित् आनंद या तिघांचा योग असेल तेच खरे शिक्षण होय.

**जीवन हेच शिक्षण आहे :** शिक्षक आणि मुले दोघेही एकमेकांच्या आचरणातून शिकत असतात दोघेही विद्यार्थीच आहे जे दिले जात नाही ते शिक्षण जे घेतले जाते त्याचा हिशोब ठेवला जाऊ शकतो ते शिक्षण नसतेच मुळी कारण शिक्षणाची मोजमाप करता येत नाही. जीवनात शिक्षण आहे कॅलरीचा खरा हिशोब कागदावर नव्हे तर शरीरावर दिसून येतो जे अनुभवाने खाल्ले पचवले रक्तात मुरले तेच खरे शिक्षण होय.

**शिक्षण हा निवारक उपाय :** आपण जे बाहेर जगातून शिकतो ते सर्व विसरून त्याच्या जागी संस्कार मात्र शिल्लक राहतात. शिक्षण म्हणजे माहिती भरून उरलेले संस्कार शिक्षण उत्तेजक दवा नसून तो प्रतिबंध निवारक उपाय आहे.

**शाळा आणि घर :** मनुष्य घरात झोपतो आणि शाळेत शिकतो त्यामुळे जीवन आणि विचार यांचा मेळ बसत नाही याला उपाय म्हणजे एका बाजूने घरात शाळा शिरली पाहिजेत आणि दुसऱ्या बाजूने शाळेत घर घुसले पाहिजेत समाजशास्त्र द्याने शालेय कुटुंबे निर्माण केली पाहिजेत आणि शिक्षण शास्त्रज्ञाने कौटुंबिक शाळा स्थापन केल्या पाहिजेत.

**1) शिक्षणाची तत्वे:**

विनोबा भावे म्हणतात मला कोणी विचारले की मुलांच्या शिक्षणाचे तत्त्व काय तर मी थोडक्यात सांगेन की शिक्षण देणाऱ्या शिक्षकांनी बालक व्हायचे आणि शिक्षण घेणाऱ्या बालकांनी मोठे व्हायचे शिक्षक बालक होऊ शकत नसेल, तर तो शिक्षण देत नाही आणि बालक मोठा होऊ शकत नसेल तर तो शिक्षण घेत नाही असे समजले पाहिजेत. शिकणे ही स्वतंत्र क्रिया असून शिकविणे ही देखील स्वतंत्र क्रिया आहेत मी शिकवितो हा अध्यापका चा अहंकार आहे. त्यामुळे शिक्षक जोपर्यंत अहंकार बाळगतील तो पर्यंत शिक्षणाचे तत्व आमच्या लक्षात येणार नाही माणूस मुलगा अपूर्णच आहे व तो शिक्षणाने अपूर्ण ते कडून पूर्णत्वाकडे जाणारा आणि पूर्णत्वाकडे जाण्यासाठी शोध घेणारा असला पाहिजेत. शिक्षकाने त्याच्या स्वाभाविक विकासाला मदत करणे हे त्याचे काम अस्पष्ट तून स्पष्ट समजणे म्हणजे शिक्षण अशा प्रकारच्या शिक्षणाला विनोबांनी अंत शिक्षण म्हटले आहेत. बाह्य शिक्षणापेक्षा हे अधिक महत्त्वाचे आहेत बाह्य शिक्षण अत्यावश्यक असले तरी त्याचे संस्कार कायम टिकणारे नसतात त्यामुळे आत्मविश्वासाच्या दृष्टीने ते भावात्मक असते केवळ संस्कारच टिकतात तसेच स्मृती म्हणजे शिक्षण नव्हे.

सृष्टी विविध रूपांनी अनेक विविध तत्वांनी भरलेली आहेत. या दृष्टीचे अंतर्बाह्य निरीक्षण परीक्षण व सर्वेक्षण यातून होणारा भाव बोध आणि त्यामुळे होणारे तत्वचिंतन हेच शिक्षण आहे यासाठी सृष्टीचा ग्रंथ आपणासमोर खुला आहे माणसाला प्रत्येक वस्तू पासून शिक्षण मिळतेच बाह्य शिक्षणाने माहिती मिळते ज्ञान मिळत नाही. पण अंत शिक्षणाने ज्ञान मिळते म्हणून ते एक ते जे टिकते ते शिक्षण असे विनोबा म्हणतात.

**2) शिक्षणाचा पाया:**

शिक्षण आणि जीवन वेगवेगळे नाही जीवनासाठी शिक्षण असते त्यामुळे ते जगत असतानाच ज्ञानार्जन झाले पाहिजेत जीवनातील प्रत्येक कार्य करीत असतांना शिक्षण मिळाले पाहिजेत कर्म करीत असतानाच चिंतन प्रक्रियेमुळे विविध प्रकारचे प्रश्न विचारले जातात नवे ते विचारले गेले पाहिजेत आणि प्रश्नांची उत्तरे संशोधक वृत्तीने शिक्षण घेणाऱ्या ने स्वतःला दिली पाहिजेत किंवा मार्गदर्शन

करणाऱ्या गुरूने दिली पाहिजे शिक्षण हे कर्तव्य म्हटले की त्यातला आनंद संपतो त्यामुळे आजचे शिक्षण हे खरे शिक्षण नाही. शिक्षणाचा पाया असा असावा की त्यामुळे जीवन साक्षर होण्यापेक्षा सार्थक होईल आजच्या शिक्षण पद्धतीमुळे जीवनाचे दोन तुकडे पडतात आदी शिक्षण आणि मग जीवन जगणे त्यामुळे आजचा विद्यार्थी लहानपणापासून जीवनाची जबाबदारी घेऊ शकत नाही संपूर्ण बे जबाबदारीतून संपूर्ण जबाबदारी त्याला घ्यावी लागते तेच तर जमत नाही यालाच विनोबांनी समर्पक उपमा दिली आहे. ती म्हणजे हनुमान उडी तो अशा उड्या मारतो की हातपाय तोडून घेतो. ज्ञान व कर्म याचे शिक्षण बरोबर झाले तरच समाज एक संघ राहील ज्ञान संपादन करणारे निराळे व कर्म करणारे वेगळे त्यामुळे समाजात अनावस्था प्रसंग ओढवतो महात्मा गांधींच्या नई तालीमच्या शिक्षण पद्धतीत शारीरिक-मानसिक व बौद्धिक परिश्रमाचे समान मूल्य आहे असे सांगितले त्यात ज्ञान व कर्म या बाबी अलग नाही नई तालीम हा एक विचार आहे ते एक प्रकारे जीवनदर्शन आहे शील प्रधान संयम प्रधान आहे त्यातील दृष्टी घेऊनच कामाला लागले पाहिजेत.

नई तालीमचे त्रिविध ज्ञान असे हवे एक आजच्या गरजांचे ज्ञान दोन वेळोवेळी गरजा निर्माण होतील त्यांचे ज्ञान संपादन करण्याची कला तीन आणि आत लपलेले स्वयंभू ज्ञान नई तालीम म्हणजे नवा समाज बनवणारी तालीम तिचा मंत्र शिक्षण शरीरे परिश्रम निष्ठा असले पाहिजेत.

**3) स्वावलंबनाचे शिक्षण:**

शिक्षण आणि विद्यार्थी स्वावलंबी झाला पाहिजेत परंतु आजच्या शिक्षणात स्वावलंबन आला कितपत स्थान आहे. ज्या वयात तरुणांनी आपल्या सर्व कर्मे इंद्रियांना बलवान करून पंचमहाभूतांच्या रुद्र स्वरूपाशी सुद्धा दोन हात करण्याची सिद्धता करायला हवी ज्या वयात आजचा युवा वर्ग चार भिंतीत बंदिस्त असतो त्यामुळे तो निष्क्रिय निर्जीव कर्तुत्व हिम पोपटपंची करणारा आत्मविश्वास शून्य होत असतो. त्याच्या जीवनातील कोणतेही आव्हान स्वीकारण्याची जिद्द ईर्षा हिम्मतच राहत नाही. नियंत्रण व सावली मनातून शिक्षणाचा मार्ग पुढे सरकतो हे त्याला समजत नाही. त्यामुळे त्याच्या स्वतंत्र प्रज्ञेचा व प्रतिभेचा अंकुर फुटत नाही सोळाव्या वर्षापर्यंत स्वावलंबनाचे शिक्षण व त्यानंतर स्वावलंबनाने शिक्षण अशी योजना झाल्याशिवाय आजच्या सामन्यातून शिक्षणाची सुटका होणार नाही.

**4) विनोबांची शिक्षण दृष्टी:**

विनोबांनी वेगवेगळ्या लेखनातून प्रवचनातून सूत्रमय पद्धतीने आपली शिक्षणविषयक कल्पना मांडली आहे त्यांची शिक्षण दुरुस्ती भारतीय संचित आतून आणि परंपरेतून निर्माण झाली आहेत त्यामुळे ती तेथील जीवन दृष्टीशी सुसंगत आहेत. परमेश्वराच्या सृष्टीत अपूर्ण असे काहीच नाही सर्व चराचर वस्तू जवळ पूर्णत्वाने देणे आहेत ते अप्रगत आहेत बिजा अवस्थेत आहेत ते प्रगत व विकसित करण्याची क्रिया म्हणजे शिक्षण म्हणून शिक्षणाचा प्रवास पूर्णत पुणम असा आहे पूर्णा पासून पूर्णा कडे कळीतून पुष्पाकडे चंद्रकोर पासून पूर्ण बिंदवाकडे कळीच्या विकसन आला चंद्रकोरीच्या प्रगट शासनाला मदत करणे हेच शिक्षकाचे काम फुलाचे रंग रूप गंध सुकुमार य हे सारे वैभव पडित बंदिस्त आहेत हळुवार फुंकर घालून पाकळी विलग व्हायला मदत करणे महत्त्वाचे फुलांचे रंग सौंदर्य रूप माधव गंध माधुर्य शिक्षणाने निर्माण केले नाही शिक्षकाने प्रधान केले नाही कळी जवळ मुळातच जे होते तेच प्रगट झाले विद्यार्थ्याचे त्याला अज्ञात असलेले गुप्त पूर्णत्व चूक ओळखणे ते सर्व गाणे फुलविण्यासाठी तत्परतेने सहाय्यभूत होणे हेच शिक्षकाचे काम होय.

**5) आचार्यांची थोर परंपरा:**

याज्ञवल्क्य रामानुजाचार्य शंकराचार्य यांनी त्यांच्या काळात समाजाला मार्गदर्शन केले होते आपण त्यांच्यात परंपरेचे वारसदार आहोत याची जाणीव आजच्या शिक्षकांना समाजात शिक्षण कार्य करताना देऊन समाजाचे मार्गदर्शन करणारे स्वप्न त्यांच्या ठायी निर्माण करण्यासाठी हा आचार्य कूल विचारांचा गाभा आहेत हा कसा सिद्ध होईल यासाठी

**विनोबांनी पुढील सिद्धांत मांडले आहेत.**

1) समाजाचे नेतृत्व आचार्यांनी करावयाचे तर आचार्य स्वतः निपक्ष पक्ष असले पाहिजेत.
2) विज्ञाननिष्ठा विद्यार्थी निष्ठा आणि समाज निष्ठा या आचार्यांच्या तीन निष्ठा असल्याच पाहिजेत.
3) शिक्षण समाज परिवर्तनाचे साधन आहे त्यावर त्यांची नितांत श्रद्धा असली पाहिजेत.
4) शिक्षण पूर्णता शासन मुक्त म्हणजे स्वायत्त असले पाहिजेत.
5) आचार्यांचा दंड शक्तीवर नव्हे जनशक्ती वर विश्वास असला पाहिजेत.
6) अशांती दमन नव्हे अशांति शमन हे त्यांनी आपले कर्तव्य मानले पाहिजेत.
7) ज्ञानशक्ती व श्रमशक्ती यांचा शिक्षण आणि व्यवहारात समन्वय असला पाहिजे.
8) आचार्य मध्ये उच्च-नीच भाव नसावा सर्वांनी सर्वांना समान दर्जाचे मानावे.
9) या सर्वांमध्ये कुलभावना असावी.

**मूल्यमापन:**

आचार्य विनोबा भावे यांचे शिक्षण विषयक विचार लक्षात घेतले असता, आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये किती दोष आहे याची जाणीव आपल्याला होते आणि हे दोष दूर करण्यासाठी आजच्या समाजाने विनोबा भावे यांनी सांगितलेले शिक्षण विषयक विचार स्वीकारले तर समाजाची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. माणूस घडविण्यासाठी जीवनाचे खरे ज्ञान मिळवण्यासाठी आज खऱ्या अर्थाने आचार्य विनोबा भावे यांनी सांगितलेली शिक्षणपद्धती स्वीकारून मुलांना स्वावलंबी कसे बनवता येईल या दृष्टीने त्यांचे विचार अनमोल आहेत. त्याचप्रमाणे शिक्षक कसा असावा त्याची भूमिका कोणत्या स्वरूपाची आहेत त्याचे कर्तव्य कोणते याचेही सविस्तर विश्लेषण त्यांनी आपल्या शिक्षण विषयक विचारात केलेले आहेत आणि शिक्षण म्हणजे काय याची स्पष्ट व्याख्या त्यांनी आपल्या शिक्षण विषयक विचार केलेली दिसून येते ही व्याख्या अतिशय व्यापक अशा स्वरूपाची आहे. आजच्या समाजात अशाच प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता असून विनोबांचे शिक्षण विषयक विचार निश्चितच आजच्या समाजाला विकासाकडे प्रगतीकडे घेऊन जाणारे आहेत

**संदर्भ साहित्य:**

1) के ना देशपांडे, आ.ल.माळी, भारतातील शिक्षण तज्ञ आणि विचारवंत, संकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2014.
2) प्रा. श्रीकांत वि देशपांडे, भारतीय राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2009.
3) शिवाजीराव भोसले, दीपस्तंभ, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे, 1994,
4) अनानास कुमार, शिक्षक और शिक्षा दर्शन, पाठशाळा प्रकाशन,दिल्ली.
5) www.hindichittha.com